राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
रासनिप्रा
जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, ५ बी. जे. रोड, पुणे – ४११००१.
फोन नं. - (०२०) २६०५०६४१ ई मेल आयडी -sceapune@gmail.com

जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/निवडणूक सुरू करणे/आदेश/ १२७६ /सन २०२३. दिनांक १५/०२/२०२३.

**निवडणूक महत्वाचे**

**वाचावे** :- १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुद.
२. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुद
३. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१५) मधील परंतुक.
४. महाराष्ट्र सहकारी संस्था (समितीची निवडणूक) नियम २०१४ चे नियम ३ (पाच)
५. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन आदेश क्रमांक संकीर्ण ०१२०/ प्र.क्र. ७०/१३ स, दिनांक १८.०३.२०२०, १७.०६.२०२०, २८.०९.२०२०, १६.०१.२०२१, २४.०२.२०२१,०६.०४.२०२१ व दिनांक १५.०७.२०२२
६. सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाकडील शासन आदेश क्रमांक संकीर्ण ०१२०/ प्र.क्र. ७०/१३ स दिनांक २९.११.२०२२
७. या प्राधिकरणाकडील आदेश दिनांक १३.९.२०२१, दिनांक ३०.९.२०२१ व दिनांक २६.११.२०२१, दिनांक २९.०३.२०२२ व दिनांक ०९.०१.२०२३

**प्रस्तावना** :-

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कब (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूकांचे (२५० पेक्षा कमी सभासद संख्या असलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्था वगळून) संचालन, पर्यवेक्षण व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार कोणत्याही संस्थांची किंवा संस्थांच्या वर्गाची निवडणूक पुढे ढकलण्याचे अधिकार शासनास प्राप्त आहेत. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार शासनाने वाचावे क्र. ५ च्या आदेशांनुसार ज्या प्रकरणी मा.उच्च / मा.सर्वोच्च न्यायालयाने निवडणूका घेण्याचे आदेशीत केलेले आहे अशा सहकारी संस्था वगळून राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या निवडणूका ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर वेळोवेळी पुढे ढकललेल्या आहेत. शेवटच्या आदेशानुसार सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांच्या निवडणूक प्रक्रिया दिनांक ३०.०९.२०२२ पर्यंत पुढे ढकललेल्या आहेत. निवडणूका पुढे ढकलण्याचा कालावधी दिनांक ३०.०९.२०२२ रोजी समाप्त झालेला आहे. आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७३ कक मधील तरतुदीनुसार शासनाने वाचावे क्र. ६ च्या आदेशानुसार ज्या प्रकरणी मा. उच्च/ मा. सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक घेण्याचे आदेशीत केलेले अशा सहकारी संस्था वगळून, राज्यातील "अ" व "ब" वर्ग सहकारी संस्थांच्या निवडणूका आदेशाच्या दिनांकापासून ज्या टप्प्यावर असतील त्या टप्प्यावर दिनांक २०.१२.२०२२ पर्यंत पुढे ढकललेल्या आहेत व निवडणूका पुढे ढकलण्याचा कालावधी दिनांक २०.१२.२०२२ रोजी समाप्त झालेला असून शासनाने सहकारी संस्थांच्या निवडणूका पुढे ढकलणे संदर्भात नव्याने आदेश पारीत केलेले नाहीत. आणि,